ऑगस्ट - २०२४ * अंक- २ रा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष **2024-25**





आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**



प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**



ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**



बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY




CLUB THEME 2024-25

## संपादकीय....✍

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वांना ७८ व्या स्वतंत्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

ऑगस्ट महिना हा मेंबरशिप व न्यू क्लब डेव्हलपमेंट' डिसिग्नटेड मंथ आहे .या अनुषंगाने आपण नवीन १० सभासद आपल्या रोटरी परिवारात सहभागी करून घेत आहोत जानेवारी १९२० साली पहिल्या रोटरी क्लब ची भारतात स्थापना झाली, ती कलकत्ता शहरात. यावेळेस क्लबचे २० मेंबर होते जे सर्व नॉन इंडियन होते.१९२१ मध्ये एस. सी.रुद्रा हे पहिले भारतीय रोटेरियन झाले. ते याच क्लबमधून. तसेच एन सी लहारी हे १९२१ साली कलकत्ता रोटरी क्लब चे पहिले भारतीय सचिव झाले. ते हळू हळू एक एक पायऱ्या चढत चढत १९६२ –६३ साली रोटरी इंटरनॅशनल चे अध्यक्ष झाले होते. १९२९ मध्ये डिस्ट्रीक्ट बॉम्बे ची स्थापना झाली, तसेच १९९१–९२ला आपला डिस्ट्रीक्ट ३०३० ची स्थापना झाली.

डोळे हे शरीरातील सर्व जास्त संवेदनशील अवयव. अशा या सुंदर डोळ्यांची निगा कशी राखावी याची माहिती पान नं.७ वर डॉ.काजल फिरके यांनी दिलेल्या लेखा द्वारे दिली आहे.

या वर्षाची सुरुवात धमाकेदार झाली आहे. आपल्या क्लबच्या पदग्रहण सोहळ्यासाठी माजी रोटरी इंटरनॅशनल चे अध्यक्ष शेखर मेहता हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्यामुळे मागील महिन्यात डिस्ट्रिक्ट मधील सर्व मान्यवर आपल्या या कार्यक्रमासाठी आपल्या क्लब मध्ये उपस्थित होते. तसेच ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस आपण रोटरीचा मोठा इव्हेंट साजरा करणार आहोत. तो म्हणजे डिस्ट्रिक्ट अवॉर्ड फंक्शन. सदर कार्यक्रम आपला क्लब आयोजित करीत आहे. सर्व डिस्ट्रिक्ट मधील मान्यवर यावेळी ही उपस्थित राहतील.

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम, मित्रांनो,

असे म्हणतात की, चांगली सुरुवात ही अर्ध काम पूर्ण झाले. खरच आपल्या क्लबने खूप चांगली शुरुवात केलेली आहे. अध्यक्ष या नात्याने मी संपूर्ण क्लब मेंबर्सचे मनापासून आभार मानतो व अभिनंदन करतो.

मित्रांनो, क्लबच्या अमृतमहोत्सव वर्षी आपला क्लबच्या विविध कमिटीच्या मार्फत उपक्रम घेण्याचा मानस केलेला असून काही गोष्टी वेगवेगळ्या स्वरूपात करणार आहोत. तसेच संपूर्ण वर्ष आपण वेगवेगळे प्रोजेक्टस् घेऊन ७५ वे वर्ष साजरे करणार आहोत.

वर्षाची सुरुवात आपण क्लब असेंब्ली तसेच इन्स्टॉलेशन सेरोमनी ह्या दोन महत्त्वाची इव्हेंट ज्या उत्साहाने पार पडले, त्यामुळे आपला क्लबने एक वेगळी उंची गाठली असे म्हंटले तर अतिशयोक्ती होणार नाही. सदरहू कार्यक्रम आपल्या क्लबच्या सदस्यांनी नियोजन व पूर्व तयारीने केले ते खरच प्रशंसनीय होते. त्याच बरोबर जुलै महिन्यात जे समाजोपयोगी प्रोजेक्टस् आपल्या क्लबने राबविले. त्यात टीम वर्क म्हणून आपली छाप सोडलेली आहे. त्याबद्दल आपण सगळ्यांचा खूप–खूप आभार. उलेखनीय बाब म्हणजे या महिन्यात आपले गुरुवर्य पीपी श्री. छबिलभाई शहा यांची गुरुपौर्णिमेच्या शुभा दिनी पुस्तकतुला केली.

आपल्या क्लबची वार्षिक थीम 'बचपन' अंतर्गत, आपण येणाऱ्या महिन्यात सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी कार्यक्रम राबविणाऱ्यावर भर देणार आहोत व अश्या प्रकारे उत्कृष्ट कार्य चालू ठेऊ, अशी मनापासून आशा करतो.

धन्यवाद !

**– रो. ॲड. सागर चित्रे**

# जुलै महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ ५ जुलै –** रोजी घेण्यात आलेल्या साप्ताहिक सभेत १० जुलैला होणाऱ्या पदग्रहण समारंभाबद्दल चर्चा करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे पूर्ण वेळापत्रक ठरविण्यात आले. तसेच कामाची विभागणी करण्यात आली.




**✻ १० जुलै –** १२ जुलै रोजी होणारी साप्ताहिक सभा ही१० जुलै रोजी घेण्यात आली. यावेळी आपल्या क्लबचा पदग्रहण समारंभ पार पडला. ही सभा रोटरी भवन मायादेवी नगर येथे घेण्यात आली. रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष रो.शेखर मेहता हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. तसेच डिस्ट्रीक्ट ३०३० मधील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.




**✻ १९ जुलै –** रोजी झालेली साप्ताहिक सभा ही 'बजेट मिटींग' होती. यावेळी सर्वानुमते मागील वर्षाचे जमा खर्च मंजूर करण्यात आले. तसेच येत्या वर्षाचेही अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**✻ २६ जुलै** – रोजी झालेली साप्ताहिक सभा ही फॅमिली मिटींग होती. यावेळी डेझिग्नेटेड मंथ 'माता व बाल संगोपन' या विषयाला अनुसरून डॉ.श्रद्धा चांडक यांचे माहितीपूर्ण व्याख्यान ठेवण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.शुभदा कुलकर्णी यांनी करून दिला. तसेच गुरूपौर्णिमा निमित्त रो.पी.पी. छबीलभाई शहा यांची तुलादान (पुस्तक, वही, पेन) करण्यात आले.



# जुलै महिन्यातील प्रोजेक्टस्



✻ **३ जुलै –** रोजी 'प्लास्टिक पिशव्यामुक्त' दिना निमित्त रोटरी क्लब जळगाव तर्फे सुभाष चौक परिसरात २५० नागरिकांना कापडी पिशव्या देण्यात आल्या. यावेळी रोटरी क्लब जळगावचे पदाधिकारी उपस्थित होते.

✻ **४ जुलै –** रोजी रोटरी क्लब जळगावतर्फे कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी १०० फळझाडांची लागवड करण्यात आली. रोटरी क्लबचे २० हून अधिक सदस्यांसह विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ.व्ही.एल.माहेश्वरी यांच्यासह ४० पेक्षा अधिक विद्यार्थी व आय.एम.आर. जळगावचे रोट्रॅक्टर सहभागी होते.





✻ **१७ जुलै –** रोजी रोटरी क्लब जळगाव व चेतना व्यसनमुक्ती केंद्र जळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्त व्यसनमुक्ती अभियाना अंतर्गत प्रतिकात्मक वारी–दिंडी काढण्यात आली. सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रोटरी क्लबचे अध्यक्ष ॲड.सागर चित्रे यांनी चेतना व्यसनमुक्ती केंद्राचे अध्यक्ष श्री.नितीन विसपुते यांना भगवद्गीता देऊन स्वागत केले व दिंडीला सुरूवात झाली ती महात्मा गांधी उद्यानात संपन्न झाली. यात अनेक रोटरी सभासद सहभागी होते.

✻ **२० जुलै –** रोजी शिक्षण प्रसारक मंडळ जळगाव संचलित प.न.लुंकड कन्या शाळेत रोटरी क्लब जळगावच्या वतीने ७x७x७ प्रोजेक्ट अंतर्गत पहिले व्याख्यान रो.कॅप्टन कुलकर्णी यांचे आयोजित करण्यात आले. विषय होता 'स्वातंत्र्य, जबाबदारी व शिस्त' तसेच रो.पद्मा जंगले मॅडम, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.स्वाती ढाके, रो.पंकज व्यवहारे यांचे व्याख्यान झाले.





# जुलै महिन्यातील प्रोजेक्टस्



*** २० जुलै –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे ११ रूग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया विष्णुलीला डोळ्यांचे हॉस्पीटल येथे करण्यात आली. रो.डॉ.तुषार फिरके व डॉ.काजल फिरके यांनी सर्व ऑपरेशन केले. तसेच रो.कंवरलालजी संघवी यांनी या प्रोजेक्टचे प्रायोजकत्व घेतले आहे. याप्रसंगी क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

*** २१ जुलै –** रोजी रोटरी क्लब जळगावच्या व्होकेशनल कमिटीच्या माध्यमातून दिपस्तंभ संचलित मनोबल केंद्राला भेट देण्यात आली. यावेळी ६० रोटरी सदस्य त्यांच्या परिवारासह उपस्थित होते. दिपस्तंभ फाऊंडेशनच्या उपक्रमास आपल्या क्लबच्या अनेक सदस्यांनी भरघोस आर्थिक मदत केली.



*** २६ जुलै –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेत आपल्या क्लबचे माजी अध्यक्ष आदरणीय छबीलभाई शहा (छबीलकाका) यांचे गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून 'तुला दान' करण्यात आले. पुस्तक, वह्या व पेन या शैक्षणिक साहित्याने यावेळी छबील काकाजींची तुलादान करण्यात आली. हे सर्व साहित्य गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर क्लबच्या वतीने रो.गिरीश कुलकर्णी यांनी लिहिलेले सन्मानपत्र मा.छबीलकाकाजींना देण्यात आले. यावेळी ते सहकुटुंब उपस्थित राहिल्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.









# पदग्रहण समारंभ

रोटरी क्लब जळगावच्या पदग्रहण सोहळ्यात नुतन अध्यक्ष ॲड.सागर चित्रे व मानद सचिव रो.पराग अग्रवाल यांनी कॉलर, पिन व चार्टर स्विकारत पदाची सूत्रे सांभाळली. रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष रो.शेखर मेहता यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रांतपाल राजिंदर खुराणा व डिस्ट्रीक्टच्या फर्स्ट लेडी गिन्नी खुराणा, माजी प्रांतपाल रो.राजीव शर्मा, सहप्रांतपाल रो.उमंग मेहता यांच्यासह डिस्ट्रीक्ट ३०३० मधील मान्यवर उपस्थित होते.
























# इतिहासातील सुवर्ण पान

**माजी प्रांतपाल रो.शांतीलाल रांका**



सन २००० –२००१ साली परत एकदा डिस्ट्रिक्ट ३०३० चे नेतृत्व करण्याचे सौभाग्य रोटरी क्लब जळगावला मिळाले. चांगल्या मतांनी निवडून रो.एस.राका डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पदी विराजमान झाले. आग्रा येथे झालेले आर. आय. इन्स्टिट्यूट आणि अमेरिकेमधील असेंबली या कार्यक्रमांना उपस्थिती देऊन १ जुलै २००० रोजी त्यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नरचा पदभार सांभाळाला. त्यांचा पदग्रहण समारंभ जे.डी.सी.सी. बँक च्या हॉलमध्ये २जुलै २००० रोजी संपन्न झाला . यावेळी डिस्ट्रिक्ट मधील अनेक मान्यवर उपस्थित होते.

त्यांच्या कार्यकाळात आयोजित डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स 'दर्पण २००१ 'ला खूप मोठ्या संख्येने सभासदांनी उपस्थिती दिली. जैन हिल्स्वर झालेल्या कॉन्फरन्स ला पी. आर. आय. पी. राजा साबू प्रमुख अतिथी होते. अनेक मान्यवर उपस्थित होते ज्यामध्ये आर. आय. पी. रीप्रेझेंटेटिव्ह रो.अरुण गुजराती तसेच भवरलालजी जैन, सुरेश दादा जैन, विजय दारदा , ईश्वर ललवाणी ,फिल्म डायरेक्टर जब्बार पटेल उपस्थित होते. कॉन्फरन्सचं वैशिष्ट्य होत ते शुद्ध शाकाहारी जेवण. या कॉन्फरन्सला यशस्वी करण्यासाठी पी.डी.जी. डॉ. सिकची, डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी रो.पुनम मानधने, कॉन्फरन्स चेअर रो. जे. आर. जाखेटे, रो. छबिलभाई शहा, रो.हरीष मिलवाणी तसेच जळगाव मधील सर्व क्लबचे अध्यक्ष यांनी खूप मेहनत घेऊन ही कॉन्फरन्स यशस्वी केली .

त्यांनी मेंबरशिप डेव्हलपमेंट वर खूप काम केले १६ नवीन क्लबसह ४९५ नवीन मेंबर्स रोटरीत सहभागी केले. या कामाबद्दल रोटरी इंटरनॅशनल चे प्रेसिडेंट फ्रँक डेवलिन यांनी त्यांना कौतुकास्पद पत्र पाठवले होते .त्यांच्या कार्यकाळात विविध ऑपरेशन कॅम्प घेण्यात आले. तसेच रेड लाइट एरियातील ५० मुलांना घर बांधून दिले. अनाथालय बांधले पोलिओ कॅम्पिंग वर काम करण्यात आले .

त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळातही त्यांनी भरघोस रोटरी कार्य करत सात अवॉर्ड मिळवले होते. रोटेरियन म्हणून त्यांनी संपूर्ण रोटरी कार्यकाळात सर्व प्रोजेक्टमध्ये सक्रीय सहभाग नोंदवून रोटरीच्या साप्ताहिक सभेस शंभर टक्के उपस्थिती नोंदवली .

त्यांचे गव्हर्नर असलेले वर्ष यशस्वी करणारे रोटरी क्लब जळगाव तसेच रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या सभासदांचे प्रेम, समर्थन आणि मनापासून केलेले सहकार्य ते कधीच विसरणार नाही .जय रोटरी!






# डोळ्यांची निगा

रो. डॉ. काजल फिरके



आयुर्वेद हे एक प्रभावी शास्त्र असून याची चिकित्सा ही दोन भागात सांगितली आहे. शमन म्हणजे अभ्यतर चिकित्सा आणि शोधन म्हणजे पंचकर्म चिकित्सा होय. कोणतेही दोष शरीरातून मूळापासून घालविण्यासाठी पंचकर्म चिकित्सा अत्यंत उपयुक्त पद्धती आहे. पंचकर्मतील विरेचन, बस्ती, आणि तर्पण या चिकित्सा डोळ्यांच्या प्रत्येक आजारा करीता आणि डोळ्यांचे आरोग्य अबाधित ठेवण्यास उपयुक्त ठरतात.

तर्पण– तर्पण म्हणजे डोळ्यामध्ये विशिष्ट प्रकारचे औषधीयुक्त तूप घालणे.यामुळे डोळ्यामध्ये वाढलेला वात, रुक्षपणा कमी करण्यास मदत करते, तसेच तर्पणामुळे डोळ्यांचा वाढलेला नंबर कमी होण्यास मदत होते.

विरेचन – ही शरीरात साठलेल्या आणि दुष्ट प्रकारे तयार होणाऱ्या पित्ताला शरीराच्या बाहेर काढण्याचे काम करते. विरेचन म्हणजे औषधी युक्त जुलाबाची प्रक्रिया. यामध्ये काही विशिष्ट प्रकारची औषधी सिद्ध तूप पोटात देऊन रुग्णाच्या व्याधी आणि दोषानुसार विरेचनाचे औषध देऊन दोष जुलाब द्वारे शरीराबाहेर टाकले जातात. आपण वर पाहिल्याप्रमाणे डोळे ही पित्ताचे असतात आणि दुष्टपित्त डोळ्यांचे अनेक व्याधी उत्पन्न करतात याकरिता विरेचन हे अत्यंत उपयोगी ठरते.

बस्ती – बस्ती ही आयुर्वेदाची अर्धी चिकित्सा पद्धती होय. औषधीयुक्त दिलेला बस्ती हा दोष बाहेर काढून टाकण्यास मदत करतो. ग्रहणी यातून नेत्राची उत्पती होते आणि म्हणूनच आयुर्वेदातील बस्ती नेत्रा रोगांसाठी अत्यंत उपयुक्त चिकित्सा आहे.

रोजच्या आहारात कोणत्या घटकांचा समावेश करावा ?

अ जीवनसत्व : डोळ्यांच्या नजरेसाठी महत्वाची भूमिका आहे. अ जीवन सत्व च्या कमतरतेमुळे रातआंधळेपणा होतो. हे डोळ्याच्या बाह्य त्वचेसाठी उपयुक्त आहे. यामुळे डोळे कोरडे पडतात, कॉर्निया पांढरा पडतो आणि अंधत्व येते.

डोळ्याच्या मागे असलेल्या संवेदनशील पडद्यावर (रेटिना) प्रकाशाचे किरण पडल्यावर अ जीवन सत्व एक रासायनिक प्रक्रिया करून परिवर्तन करते म्हणून ते डोळ्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

अ जीवन सत्व असलेले पदार्थ: गाजर, आंबा, रताळे, शेवग्याच्या शेंगा, पालक व सर्व हिरव्या पालेभाज्या.

जीवनसत्व सी– ही कोलेजन निर्मितीसाठी अत्यंत महत्वाचे आहे, एक असे प्रोटीन जे डोळ्यांची रचना करते. यामुळे डोळ्यातील जखमा लवकर भरून येण्यास मदत होते. तसेच अतिरिक्त रक्तस्त्राव झाल्यास तोही लवकर थांबविण्यास ही मदत करते. विटामीन सी ॲन्टीऑक्सीडन्ट म्हणून काम करते. मोतीबिंदू आणि मसक्युलर डिजनरेशन यामध्ये सी जीवन सत्व मुळे आजार कमी प्रमाणात वाढतो. जीवनसत्व सी असणारे घटक: लिंबू, संत्रे, आवळा, स्ट्रॉबेरी, किवी, मोड आलेली कडधान्ये.

जीवनसत्व बी - डोळ्यांच्या पापण्यांच्या हालचालीसाठी याचा अत्यंत चांगला उपयोग होतो. बी जीवनसत्व मुळे डोळ्यांवर येणारा अतिरिक्त ताण कमी होतो. यामुळे डोळ्यांचे आजार होण्यास अडथळा निर्माण होतो. जीवन सत्व बी असणारी घटकद्रव्ये: दूध, अंडी, मांसाहारी पदार्थ जसे चिकन, मटन, पालेभाज्या, चीज.

जीवन सत्व ई : हे एक अत्यंत शक्तिशाली ॲन्टीऑक्सीडन्ट आहे. मोतीबिंदू आणि यासारख्या वाढत्या वयामद्धे होणा–या डोळ्यांच्या तक्रारींवर जसे की एएमडी ही अत्यंत प्रभावशाली काम करते. जीवन सत्व ई असणारे घटक द्रव्ये:– सूर्यफूल तेल, सोयाबीन तेल, मका तेल, बदाम, शेंगदाणे, सूर्यफूल बीया, पालक, अक्रोड इ.

## जीवेत् शरदः शतम्...!

| | |
|---|---|
| १) ५ ऑगस्ट | पीपी रो.सुरेंद्र लुंकड |
| २) ८ ऑगस्ट | रो. जयवर्धन दुर्गादास नेवे |
| ३) १० ऑगस्ट | रो. प्रेमशंकर अग्रवाल |
| ४) १४ ऑगस्ट | रो. ॲड. श्रीकांत भुसारी |
| ५) १५ ऑगस्ट | रो. दिपिका चांदोरकर |
| ६) १५ ऑगस्ट | रो. रोबिन विजयकुमार लुल्ला |
| ७) १७ ऑगस्ट | रो. ॲड. हेमंत भंगाळे |
| ८) १७ ऑगस्ट | रो. नंदकिशोर जाखेटीया |
| ९) १९ ऑगस्ट | रो. प्रणेश (पारस) सुरेंद्र जैन |
| १०) २० ऑगस्ट | रो. किशोर तलरेजा |
| ११) २१ ऑगस्ट | रो. प्रदीप साठे |
| १२) २५ ऑगस्ट | रो. मकरंद डबीर |
| १३) ३१ ऑगस्ट | रो. रणवीरसिंग कलसी |

## नांदा सौख्यभरे...

१) २५ ऑगस्ट रो. डॉ. ज्ञानेश पाटील

**फोर वे टेस्ट** – जगात सर्व दूर छापल्या गेलेल्या आणि उदधृत केल्या गेलेल्या व्यावसायक नीतीमत्ता विधानांपैकी एक म्हणजे फोर वे टेस्ट. शिकागोतील दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरील ॲल्युमिनियम कंपनीचा ताबा घेण्यास सांगण्यात आलेल्या रोटेरियन हर्बर्ट जे. टेलर याने १९३२ मध्ये ही फोर वे टेस्ट तयार केली. ही धडपड कंपनी सावरण्यासाठी टेलरने २४ शब्दांची एक आचारसंहिता, सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या उद्योगात व व्यावसायिक जीवनात पाळावी म्हणून तयार केली. ही फोर वे टेस्ट म्हणजे विक्री, उत्पादन, जाहिरात आणि सर्व विक्रेते व ग्राहक यांच्याबरोबरचे संबंध या साऱ्यांसाठी मार्गदर्शिका ठरली. या साध्या तत्वज्ञानाला कंपनीच्या पुनुरुज्जीवनाचे श्रेय गेले.



माजी अध्यक्ष रो.प्रेम कोगटा

## ऑगस्ट महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी ऑगस्ट महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.



रो.चंदन महाजन

## अभिनंदन!

* रोटरी क्लब जळगाव ईस्ट तर्फे स्व.डॉ.प्रताप जाधव धन्वंतरी सेवा पुरस्काराने रो.डॉ.जयंत जहागीरदार यांना सन्मानित करण्यात आले.

* रो.डॉ.शशिकांत गाजरे यांना गुरूपौर्णिमा निमित्त झालेल्या कार्यक्रमात वैद्य भालचंद्र शंकर जहागीरदार संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले.

* रो.मकरंद डबीर यांची कन्या चिन्मयी ही अखिल भारतीय शालीवाहन संस्कृत प्रतिष्ठान तर्फे घेण्यात आलेले संस्कृत संवाद परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली.

* क्लबचे अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे यांची कन्या ॲड.मुस्कान चित्रे हिने यशस्वीरित्या कायद्याची पदवी संपादन केली.